# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

मंगळवार, दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी दुपारी १.३० वाजता मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्यमंत्री महोदयांचे समिती कक्ष मंत्रालय, मुंबई येथील सभाकक्षात संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चौथ्या सभेचा अहवाल/इतिवृत्ताच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करण्याकरीता कृपया सादर.

21.01.19

मा. महानगर आयुक्त,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

मा. ना. श्री देवेन्द्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
तथा अध्यक्ष, ना.म.प्र.वि.प्रा

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

मंगळवार, दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी दुपारी ०१.३० वाजता मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्यमंत्री महोदयांचे समिती कक्ष मंत्रालय, मुंबई येथील सभाकक्षात संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सभेचे अहवाल/ईतिवृत्त.

**उक्त बैठकीला खालील प्रमाणे उपस्थित होते.**

१) **मा. ना. श्री. देवेन्द्र फडणवीस,**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

२) **मा. ना. श्री चंद्रशेखर बावनकुळे,**
ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा तथा सदस्य, नामप्रविप्रा.

३) **मा. श्री कृपाल तुमाने (निमंत्रीत)**
खासदार, रामटेक लोकसभा निर्वाचन क्षेत्र

४) **मा. श्री सुधीर पारवे,**
आमदार, उमरेड विधान सभा क्षेत्र

५) **मा. श्री नितीन करीर, भाप्रसे**
प्रधान सचिव, नगर विकास विभाग–१
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई तथा
सदस्य, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

६) **मा. श्रीमती शीतल तेली–उगले,** भाप्रसे,
महानगर आयुक्त, तथा सदस्य सचिव,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

७) **मा. श्री संजय यादव**, भाप्रसे,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर

८) **मा. श्री अभिजीत बांगर, भाप्रसे**
आयुक्त, नागपूर महानगर पालिका, नागपूर

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**ठराव क्रमांक १/०४/०१.०१.२०१९**

**विषय :—** **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २०.०८.२०१८ रोजी संपन्न झालेल्या तिस—या बैठकीतील सभेचा अहवाल कायम करणे.**

दिनांक ०४/०३/२०१७ च्या अधिसुचने अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना झाली आहे. महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ मधील नियम क्र. ४ प्रमाणे प्राधिकरणाची रचना आहे. सोमवार दि. ०१ जानेवारी, २०१९ रोजी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची चौथी बैठक संपन्न झाली.

**ठराव : दिनांक २० ऑगस्ट २०१८ च्या प्राधिकरणाच्या तिस—या बैठकीतील एकूण १० ठराव तसेच मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची उक्त सभेत दिलेल्या निर्देशासह इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे**

ठराव क्रमांक २/०४/०१.०१.२०१९

विषय :— गुरूवार दिनांक १५ नोव्हेंबर २०१८ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या तिस—या बैठकीतील निर्णय, इतिवृत्त व अनुपालन अहवाल माहिती व अनुमोदनाकरिता ठेवण्याबाबत.

ठराव :— महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ नियम क्र. ४ अन्वये महानगर प्राधिकरणाची रचना करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील नियम क्र. ७ प्रमाणे महानगर प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १५ नोव्हेंबर २०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयांचे इतिवृत्त तथा अनुपालन अहवालास अनुमोदन देण्यात येत आहे.